रजिस्ट्री सं. डी. 281

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग 1

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| सं. 1 ] | नई दिल्ली, जनवरी 19-25, 2023/पौष 29-माघ 5 (शक) 1944 | [खंड 21 |
| No. 1 ] | NEW DELHI, JANUARY 19-25, 2023/PAUSHA 29-MAGHA-5 (SAKA) 1944 | [Vol. 21 |
| अं. १ ] | नवी दिल्ली, जानेवारी १९-२५, २०२३/पौष २९-माघ ५ (शके) १९४४ | [खंड २१ |

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली,

(1) दि मेजॉरिटी ॲक्ट, 1875 ; (2) दि ऑफिशल् ट्रस्टी ॲक्ट, 1913 ; (3) दि लीगल् सर्विसेस् ऑथोरिटी ॲक्ट, 1987 ; (4) दि गुडस् ॲन्ड सर्व्हिसेस् टॅक्स (कॉम्पेन्सेशन टू स्टेट) ॲक्ट, 2017 के मराठी अनुवाद राष्ट्रपती के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खण्ड (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जायेंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi,

The Translation in Marathi of (1) The Majority Act, 1875 ; (2) The Official Trustees Act, 1913 ; (3) The Legal Services Authorities Act, 1987 ; (4) The Good and Services Tax (Compensation to States) are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of Section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

## विधि व न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नवी दिल्ली,

(१) दि मेजॉरिटी ॲक्ट, १८७५ ; (२) दि ऑफिशल् ट्रस्टी ॲक्ट, १९१३ ; (३) दि लीगल् सर्विसेस् ऑथोरिटी ॲक्ट, १९८७ ; (४) दि गुडस् ॲन्ड सर्व्हिसेस् टॅक्स (कॉम्पेन्सेशन टू स्टेट) ॲक्ट, २०१७ यांचा मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतीच्या प्राधिकारान्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि तो, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ५०) याच्या कलम २ च्या खंड (क) अन्वये मराठीतील त्यांचा प्राधिकृत पाठ असल्याचे मानण्यात येईल.

## निर्देशसूची

## INDEX

| अनुक्रमांक<br>Serial No.<br>(१) | अधिनियमाचे नाव<br>Name of the Act<br>(२) | पृष्ठ क्रमांक<br>Page No.<br>(३) |
|---|---|---|
| १ | सज्ञानता अधिनियम, १८७५<br>The Majority Act, 1875 | ५ |
| २ | शासकीय न्यासी अधिनियम, १९१३<br>The Official Trustees Act, 1913 | ७ |
| ३ | विधि सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७<br>The Legal Services Authorities Act, 1987 | १९ |
| ४ | वस्तू व सेवा कर (राज्यांना भरपाई) अधिनियम, २०१७<br>The Goods and Services Tax (Compensation to States) Act, 2017 | ४१ |

## शासकीय न्यासी अधिनियम, १९१३[१]

(१९१३ चा अधिनियम क्रमांक २)

[२१ एप्रिल, २०२२ रोजी यथाविद्यमान]

[ २७ फेब्रुवारी, १९१३. ]

**शासकीय न्यासीचे पद घटित करण्यासंबंधीचे विधि एकत्रित व विशोधित करण्यासाठी अधिनयम.**

[२] * * * याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

भाग एक

**प्रारंभिक**

**१.** (१) या अधिनियमाला “शासकीय न्यासी अधिनियम, १९१३” असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

[३][(२) त्याचा विस्तार [४] * * * संपूर्ण भारतभर राहील.]

(३) हा अधिनियम [केंद्र सरकार] [**राजपत्रातील**] अधिसूचनेद्वारे निदेश देईल अशा [५] दिनांकास अंमलात येईल.

[६][**२.** या अधिनियमात, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,— **निर्वचन खंड.**

(१) “शासन” याचा अर्थ, राज्याच्या संदर्भात राज्य शासन आणि संघ राज्यक्षेत्राच्या संदर्भात केंद्र सरकार असा आहे.

[७] * * * * *

(३) “विहित” याचा अर्थ, या अधिनियमाखालील नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे.]

---

१. हा अधिनियम, भूतपूर्व बंगाल प्रांताला लागू करताना ‘शासकीय न्यासी (बंगाल विशोधन) अधिनियम, १९४०’ (१९४० चा बंगाल अधिनियम क्र. १२) आणि ‘शासकीय न्यासी (बंगाल विशोधन) अधिनियम, (१९४१ चा बंगाल अधिनियम क्र. १) द्वारे विशोधित करण्यात आला.

हा अधिनियम ‘बेरार विधि अधिनियम, १९४१’ (१९४१ चा ४) द्वारे बेरारवर आणि १९६३ चा विनियम ६, कलम २ आणि अनुसूची एक यांद्वारे दादरा व नगर हवेलीवर (१ जुलै, १९६५ रोजी व तेव्हापासून) विस्तारित करण्यात आला.

२. १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८, कलम २ द्वारे उद्देशिका वगळली.

३. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे पूर्वगामी पोट-कलमाऐवजी घातले.

४. १९६८ चा अधिनियम क्रमांक २५, कलम २ आणि अनुसूची यांद्वारे “जम्मू व काश्मीर राज्यखेरीज करून” हे शब्द गाळले.

५. १ एप्रिल, १९१४, पहा अधिसूचना क्रमांक १८०१-सी, दिनांक १३ मार्च, १९१४, भारताचे राजपत्र, १९१४, भाग-एक, पृष्ठ ३६५.

६. विधि अनुकूलन (क्र. २) आदेश. १९५६ द्वारे पूर्वीच्या कलमाऐवजी घातले.

७. १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८, कलम ३ द्वारे खंड (२) गाळला.

**उच्च न्यायालयाच्या अधिकारीतेचा विस्तार.** [1][**३.** या अधिनियमान्वये किंवा 'भारतीय न्यास अधिनियम, १८८२' अन्वये शासकीय न्यासीद्वारे किंवा त्यांच्या विरुद्ध दाखल करण्यात आलेल्या कार्यवाहींच्या संबंधात, उच्च न्यायालय, ते ज्या क्षेत्राच्या संबंधात दिवाणी अपील अधिकारिता वापरत असेल त्या संपूर्ण क्षेत्रात सक्षम न्यायालय असेल : (१८८२ चा २)

परंतु, कोणत्याही जिल्हा न्यायालयाच्या अधिकारीतेला बाध येतो असा या कलमातील कशाचाही अर्थ लावण्यात येणार नाही.]

भाग दोन

## शासकीय न्यासीचे पद

**शासकीय न्यासी.** **४.** [2][ (१) [3][ शासन प्रत्येक राज्याकरिता एक शासकीय न्यासी नियुक्त करील] :

परंतु, एकाच व्यक्तीची, दोन किंवा अधिक [4][राज्यां]करिता शासकीय न्यासी म्हणून नियुक्ती करण्यास यात अंतर्भूत असलेल्या कशामुळेही रोध येतो असे मानले जाणार नाही.]

[5][(२) किमान—

(क) सात वर्षे, अधिवक्ता ; किंवा

(ख) सात वर्षे, उच्च न्यायालयाचा न्यायप्रतिनिधी ; किंवा

(ग) दहा वर्षे, राज्याच्या न्यायिक सेवेचा सदस्य ; किंवा

(घ) पाच वर्षे, उप शासकीय न्यासी ;

असल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीची शासकीय न्यासीच्या पदावर नियुक्ती केली जाणार नाही.]

[6]* * * * *

**उप शासकीय न्यासीची नियुक्ती व त्यांचे अधिकार.** **५.** [7][(१) शासकीय न्यासीला सहाय्य करण्यासाठी शासन एक किंवा अनेक उप शासकीय न्यासी नियुक्त करू शकेल; आणि अशा प्रकारे नियुक्त केलेला कोणताही उप शासकीय न्यासी हा शासनाच्या नियंत्रणाच्या आणि शासकीय न्यासीच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांच्या अधीनतेने, शासकीय न्यासीचे कोणतेही कर्तव्य पार पाडण्यास आणि त्याचे कोणतेही अधिकार वापरण्यास सक्षम असेल आणि अशी कर्तव्ये पार पाडत असताना किंवा असे अधिकार वापरत असताना, त्यास शासकीय न्यासीचेच विशेषाधिकार असतील आणि तो त्याच्याच दायित्वाच्या अधीन राहील.

[8][(२) किमान तीन वर्षे—

(क) अधिवक्ता ; किंवा

(ख) उच्च न्यायालयाचा न्यायप्रतिनिधी; किंवा

(ग) राज्याच्या न्यायिक सेवेचा सदस्य;

असल्याखेरीज कोणतीही व्यक्ती उप शासकीय न्यासी म्हणून नियुक्त केली जाणार नाही.]

---

१. १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८, कलम ४ द्वारे समाविष्ट केले. विधि अनुकूलन (क्र. २) आदेश, १९५६ द्वारे पूर्वीचे कलम ३ निरसित केले.

२. विधि अनुकूलन (आदेश) १९३७ द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी घातले.

३. विधि अनुकूलन (आदेश) (क्र. २) १९५६ द्वारे पहिल्या परिच्छेदाऐवजी घातला.

४. विधि अनुकूलन (आदेश) १९५० द्वारे "विभागां" ऐवजी घातला.

५. १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८, कलम ५ द्वारे, पोट-कलम (२) ऐवजी घातले.

६. विधि अनुकूलन (आदेश), १९३७ द्वारे पोट-कलम (३) गाळले.

७. १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८, कलम ६ द्वारे कलम ५ ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

८. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे समाविष्ट केले.

**६.** शासकीय न्यासी हा ज्या राज्याकरिता त्याची नियुक्ती झाली आहे त्या [१][राज्याचा] शासकीय न्यासी या नावाचा एक एकल निगम असेल आणि असा शासकीय न्यासी म्हणून त्याला अखंड उत्तराधिकार परंपरा व अधिकृत मुद्रा असेल आणि आपल्या निगम नावाने तो दावा दाखल करू शकेल किंवा त्याच्याविरुद्ध दावा दाखल केला जाऊ शकेल.

**शासकीय न्यासी हा एकल निगम असणे, त्यास अखंड उत्तराधिकार परंपरा आणि अधिकृत मुद्रा असणे आणि आपल्या निगम नावाने त्यास दावा दाखल करता येणे किंवा त्याच्याविरुद्ध दावा दाखल केला जाऊ शकणे.**

भाग तीन

## शासकीय न्यासीचे हक्क, अधिकार, कर्तव्ये व दायित्वे

**७.** (१) या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदीच्या अधीनतेने आणि त्यानुसार शासकीय न्यासी, त्याला योग्य वाटल्यास,—

**शासकीय न्यासींचे सर्वसाधारण अधिकार व कर्तव्ये.**

(क) सर्वसाधारण न्यासी म्हणून कार्य करू शकेल;

(ख) सक्षम अधिकारितेच्या न्यायालयाकडून न्यासी म्हणून नियुक्त केला जाऊ शकेल.

(२) यात यापुढे सुस्पष्टपणे तरतूद केली असेल ते खेरीजकरून त्याच नात्याने कार्य करणाऱ्या इतर कोणत्याही न्यासीला जे अधिकार, कर्तव्ये आणि दायित्वे असतील आणि तो ज्या हक्क व विशेषाधिकार यांचा हक्कदार असेल आणि तो न्यायालयाच्या ज्या नियंत्रणाच्या आणि आदेशांच्या अधीन असेल तेच अधिकार, कर्तव्ये आणि दायित्वे शासकीय न्यासीला असतील आणि त्याच हक्क व विशेषाधिकारास हक्कदार असेल व तो न्यायालयाच्या त्याच नियंत्रणाच्या व आदेशांच्या अधीन असेल.

(३) शासकीय न्यासी हा कोणताही न्यास स्वीकारण्यास एकतर पूर्णपणे किंवा तो लादू शकेल अशा अटींनुसार असेल त्याव्यतिरिक्त, नकार देऊ शकेल.

(४) धनकोंच्या फायद्यासाठी आपसमेळाच्या किंवा व्यवस्थेच्या योजनेच्या अधीन असलेला किंवा जी नादार असल्याचे त्याला माहीत आहे किंवा त्याचा तसा विश्वास आहे अशा कोणत्याही संपदेचा कोणताही न्यास शासकीय न्यासी स्वीकारणार नाही.

(५) या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमांद्वारे तरतूद केली असेल त्याखेरीज, शासकीय न्यासी, धार्मिक प्रयोजनाकरिता असलेला किंवा ज्यामध्ये कोणत्याही व्यवसायाचे व्यवस्थापन किंवा तो व्यवसाय चालवणे अंतर्भूत आहे असा कोणताही न्यास स्वीकारणार नाही.

(६) मृत व्यक्तीने मृत्युपत्रान्वये शासकीय न्यासीला स्पष्टपणे एकमेव मृत्युपत्र व्यवस्थापक आणि एकमेव न्यासी म्हणून नियुक्त केले असेल त्याखेरीज, शासकीय न्यासी एखाद्या मृत व्यक्तीच्या संपदेचे प्रशासन करणार नाही.

(७) शासकीय न्यासी हा नेहमी एकमेव न्यासी असेल आणि इतर कोणत्याही व्यक्तीबरोबर न्यासी म्हणून शासकीय न्यासीची नियुक्ती करणे कायदेशीर होणार नाही.

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे “विभागाचा” या ऐवजी घातला.

**प्रदात्याकडून शासकीय न्यासीची, त्याच्या संमतीने, समझोत्याचा न्यासी म्हणून नियुक्ती केली जाऊ शकणे.**

**८.** (१) या अधिनियमाच्या तरतुदीन्वये शासकीय न्यासीला जे न्यास स्वीकारण्याची मनाई करण्यात आली आहे त्याखेरीज इतर न्यास निर्माण करू इच्छिणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस तो न्यास निर्माण करणाऱ्या संलेखाद्वारे आणि शासकीय न्यासीच्या संमतीने त्याला त्या नावाने, किंवा पुरेसे असेल अशा इतर वर्णनाने अशा न्यासाधीन संपत्तीचा न्यासी म्हणून नियुक्त करता येईल :

परंतु, शासकीय न्यासीच्या संमतीचा उक्त संलेखामध्ये उल्लेख करण्यात आला असला पाहिजे आणि अशा संलेखाचे शासकीय न्यासीकडून रीतसर निष्पादन करण्यात आले असले पाहिजे.

(२) अशा नियुक्तीनंतर, न्यासाधीन संपत्ती अशा शासकीय न्यासीकडे निहित होईल आणि अशा संलेखामध्ये घोषित न्यासांवर तो ती धारण करील.

**शासकीय न्यासीची मृत्युपत्राद्वारे न्यासी म्हणून नियुक्ती.**

**९.** ज्यावेळी कोणत्याही मृत्युपत्रान्वये, शासकीय न्यासीची त्या नावाने किंवा इतर कोणत्याही पुरेशा वर्णनाने न्यासी म्हणून नियुक्ती करण्यात आली असेल त्यावेळी, [१][मृत्युपत्रकर्त्याच्या] मृत्युपत्राचा व्यवस्थापक किंवा त्याच्या संपत्तीचा प्रशासक, मृत्युपत्रप्रमाणपत्र किंवा प्रशासनपत्र मिळवल्यानंतर, अशा शासकीय न्यासीला अशा मृत्युपत्राचा मजकूर विहित पद्धतीने अधिसूचित करील ; आणि जर शासकीय न्यासीने तो न्यास स्वीकारण्यास संमती दिली तर, अशा मृत्युपत्रव्यवस्थापकाकडून किंवा प्रशासकाकडून न्यासाधीन संपत्ती हस्तांतरित करणारा लिखित संलेख करून देण्यात आल्यानंतर, अशी संपत्ती अशा शासकीय न्यासीकडे निहित होईल आणि तो ती उक्त मृत्युपत्रात व्यक्त करण्यात आलेल्या न्यासांवर धारण करील :

परंतु, शासकीय न्यासीच्या संमतीचा उक्त संलेखामध्ये उल्लेख केलेला असला पाहिजे आणि अशा संलेखाचे शासकीय न्यासीकडून रीतसर निष्पादन करण्यात आले असले पाहिजे.

**शासकीय न्यासीला संपत्तीचा न्यासी म्हणून नियुक्त करण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार.**

**१०.** (१) जर या अधिनियमाच्या तरतुदीन्वये शासकीय न्यासीला स्वीकारण्याची मनाई करण्यात आलेली आहे असे न्यास खेरीजकरून, अन्य न्यासाच्या अधीन कोणतीही संपत्ती असेल आणि उच्च न्यायालयाच्या सर्वसाधारण किंवा असाधारण मूळ दिवाणी अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये त्या न्यासामध्ये कार्य करण्यास तयार किंवा समर्थ असलेला न्यासी नसेल तर, उच्च न्यायालय शासकीय न्यासीची, त्याच्या संमतीने, त्या नावाने, अशा संपत्तीचा न्यासी म्हणून नियुक्ती केल्याचा आदेश, अर्ज केल्यानंतर, देऊ शकेल.

(२) अशा आदेशानंतर, अशी संपत्ती शासकीय न्यासीकडे निहित होईल आणि अशा आदेशाच्या पूर्वी ती ज्या न्यासांवर धारण केली जात असेल त्याच न्यासांवर तो ती धारण करील, आणि अशा आदेशाच्या दिनांकापूर्वी केलेल्या कृत्यांच्या बाबतीत असेल ते खेरीजकरून, पूर्वीच्या न्यासीला किंवा न्यासींना (कोणतेही असल्यास) अशा संपत्तीचे न्यासी म्हणून असलेल्या दायित्वातून सूट दिली जाईल.

(३) या कलमातील कशामुळेही [२]* * * भारतीय न्यास अधिनियम, १८८२ याच्या तरतुदींना बाध येतो असे मानले जाणार नाही. १८८२ चा २.

**शासकीय न्यासीला संपत्तीचा न्यासी म्हणून नियुक्त करण्याचा खाजगी न्यासींचा अधिकार.**

**११.** (१) जर या अधिनियमाच्या तरतुदीन्वये शासकीय न्यासीला स्वीकारण्याची मनाई करण्यात आलेली आहे असे न्यास खेरीजकरून, अन्य न्यासाच्या अधीन कोणतीही संपत्ती असेल आणि सर्व न्यासी किंवा उत्तरजीवी, किंवा संतत न्यासीची किंवा न्यासींची आणि त्या न्यासामध्ये लाभप्रद हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींची जर अशी इच्छा असेल की, अशा न्यासीच्या किंवा न्यासींच्या जागी शासकीय न्यासीची नियुक्ती करण्यात यावी तर, अशा न्यासीने किंवा न्यासींनी लेखी संलेख करून त्याद्वारे शासकीय न्यासीची त्या नावाने किंवा इतर पुरेशा वर्णनाने, त्याच्या संमतीने, अशा संपत्तीचा न्यासी म्हणून नेमणूक करणे कायदेशीर असेल :

परंतु, शासकीय न्यासीच्या संमतीचा उक्त संलेखामध्ये उल्लेख केलेला असला पाहिजे आणि अशा संलेखाचे शासकीय न्यासीकडून रीतसर निष्पादन करण्यात आले असले पाहिजे.

---

१. १९१९ चा अधिनियम क्रमांक १८, कलम २ आणि अनुसूची एक यांद्वारे "असा मृत्युपत्रकर्ता" याऐवजी घातला.

२. १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८, कलम ७ द्वारे "न्यासी व गहाणदार यांच्या शक्तींबाबतचा अधिनियम, १८६६ किंवा" हे शब्द गाळले.

(२) अशा नियुक्तीनंतर अशी संपत्ती शासकीय न्यासीकडे निहित होईल आणि अशा नियुक्तीपूर्वी ती ज्या न्यासांवर धारण केली जात असेल त्याच न्यासांवर तो ती धारण करील आणि अशा नियुक्तीच्या दिनांकापूर्वी केलेल्या कृत्यांच्या बाबतीत असेल ते खेरीजकरून, पूर्वीच्या न्यासीला किंवा न्यासींना अशा संपत्तीचे न्यासी म्हणून असलेल्या सर्व दायित्वातून सूट दिली जाईल.

**मृत्युपत्र व्यवस्थापक किंवा प्रशासक शासकीय न्यासीला अज्ञान व्यक्ती किंवा वेडा यांची मृत्युपत्रित संपत्ती, हिस्सा इत्यादी देऊ शकतो.**

**१२.** (१) जर कोणत्याही [1][अज्ञान] किंवा वेड्या व्यक्तीस कोणतीही देणगी, मृत्युपत्रित संपत्ती किंवा मृत व्यक्तीच्या मत्तेचा हिस्सा मिळण्याचा हक्क असेल तर, ज्या व्यक्तीने अशी देणगी दिली आहे तिने किंवा ज्याच्याकडून अशी मृत्युपत्रित संपत्ती किंवा हिस्सा प्रदेय किंवा हस्तांतरणयोग्य आहे अशा मृत्यूपत्र व्यवस्थापकाने किंवा प्रशासकाने किंवा अशा देणगीच्या, मृत्युपत्रित संपत्तीच्या किंवा हिश्शाच्या कोणत्याही न्यासीने लिखित संलेखाद्वारे शासकीय न्यासीला त्या नावाने किंवा इतर कोणत्याही पुरेशा वर्णनाने, त्याच्या संमतीने, त्याचे हस्तांतरण करणे कायदेशीर असेल :

परंतु, शासकीय न्यासीच्या संमतीचा उक्त संलेखामध्ये उल्लेख केलेला असला पाहिजे आणि अशा संलेखाचे शासकीय न्यासीकडून रीतसर निष्पादन करण्यात आले असले पाहिजे.

(२) या कलमान्वये शासकीय न्यासीकडे हस्तांतरित करण्यात आलेले कोणतेही धन किंवा संपत्ती त्याच्याकडे निहित होईल आणि ती अशा शासकीय न्यासीकडे निहित झालेल्या इतर कोणत्याही संपत्तीबाबत या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या तरतुदीच्याच अधीन राहील.

**शासकीय न्यासीला बंधपत्र किंवा प्रतिभूती देण्यास भाग पाडता न येणे.**

**१३.** (१) या अधिनियमान्वये कोणत्याही नात्याने करण्यात आलेल्या नियुक्तीनंतर, कोणतेही न्यायालय कोणत्याही शासकीय न्यासीला कोणतेही बंधपत्र किंवा प्रतिभूती करून देण्यास भाग पाडणार नाही.

(२) कोणत्याही शासकीय न्यासीने [2]* * * या अधिनियमाच्या तरतुदीन्वये सादर केलेला कोणताही विनंती-अर्ज त्याच्या सहीने असेल त्याखेरीज अन्यथा सत्यापित करण्यास त्याला भाग पाडले जाणार नाही, आणि जर अशा कोणत्याही विनंतीअर्जामध्ये नमूद केलेली तथ्ये [3][त्याला व्यक्तिशः माहीत] नसतील तर, सत्यापन करण्यास सक्षम असलेल्या कोणत्याही व्यक्तीला त्या विनंतीअर्जाचे सत्यापन करून त्यावर स्वाक्षरी करता येईल.

**शासकीय न्यासीची नोंद म्हणजे न्यासाची नोटीस असे न होणे.**

**१४.** एखाद्या कंपनीच्या पुस्तकांतील शासकीय न्यासीची त्या नावाची नोंद ही न्यासाची नोटीस समजली जाणार नाही ; आणि शासकीय न्यासी हा एक निगम आहे या एकाच कारणास्तव एखाद्या कंपनीला आपल्या नोंदवहीत शासकीय न्यासीच्या नावाची नोंद करण्याला आक्षेप घेण्याचा हक्क असणार नाही; आणि संपत्ती विषयीचे व्यवहार करताना जिच्याशी व्यवहार करावयाचा ती व्यक्ती शासकीय न्यासी आहे ही वस्तुस्थिती न्यासाची नोटीस समजली जाणार नाही.

---

१. १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८, कलम ८ द्वारे "अर्भक" ऐवजी घातला.

२. १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८, कलम ९ द्वारे "उप शासकीय न्यासी" हे शब्द गाळले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे "शासकीय न्यासीला व्यक्तिशः माहीत" या मजकुराऐवजी घातले.

**शासनाचे दायित्व.** **१५.** (१) शासकीय न्यासी हा एखादा खाजगी न्यासी असता तर, त्याला जे कोणतेही दायित्व भागवण्यास तो व्यक्तिशः जबाबदार असेल असे दायित्व भागवण्यास लागतील अशा सर्व रकमा भरून देण्यास [१]* * * शासन [२]* * * जबाबदार राहील, मात्र जेव्हा ते दायित्व शासकीय न्यासी किंवा त्याचा कोणताही अधिकारी यांचा ज्यामध्ये कोणत्याही प्रकारचा सहभाग नाही असे दायित्व असेल किंवा त्यास किंवा त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्यास रास्त तत्परता वापरून टाळता आले नसते असे दायित्व असेल त्याबाबतीत शासकीय न्यासी किंवा [३][शासन] कोणत्याही दायित्वाच्या अधीन असणार नाही.

(२) [३][शासन] किंवा या अधिनियमान्वये नियुक्त केलेला कोणताही शासकीय न्यासी या अधिनियमाच्या आरंभापूर्वी कोणत्याही शासकीय न्यासीच्या प्राधिकारान्वये किंवा तदनुसार करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी जबाबदार ठरतो असे पोट-कलम (१) मधील कशाहीमुळे मानले जाणार नाही.

**विवक्षित परिस्थितीत दाव्याच्या नोटिशीची आवश्यकता नसणे.** **१६.** दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या कलम ८० मधील कोणतीही गोष्ट, शासकीय न्यासीविरुद्ध करण्यात आलेल्या ज्या दाव्यामध्ये व्यक्तिशः त्याच्याविरुद्ध कोणत्याही अनुतोषाची मागणी करण्यात आलेली नाही, अशा कोणत्याही दाव्यास लागू होणार नाही. (१९०८ चा ५.)

भाग चार

**फी**

**फी.** **१७.** (१) शासकीय न्यासीच्या कर्तव्यांच्या संबंधात, शासन, विहित करील अशी- मग ती टक्केवारीप्रमाणे असो किंवा अन्यथा असो- फी आकारण्यात येईल.

[४]* * * * *

---

१. १९२२ चा अधिनियम क्रमांक २१, कलम ३ द्वारे "भारत" हा शब्द गाळला.

२. १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८, कलम १० द्वारे "उत्पन्नाच्या बाबी" हे शब्द गाळले.

३. "भारत शासनाच्या उत्पन्नाच्या बाबी" हे शब्द अनुक्रमे १९२२ चा अधिनियम क्रमांक २१, कलम ३, विधि अनुकूलन आदेश, १९३७ आणि १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८, कलम १० द्वारे विशोधित करण्यात आले, त्यांचे त्यांचे वर्तमान स्वरूप वरीलप्रमाणे आहे.

४. १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८, कलम ११ द्वारे परंतुक गाळले.

(२) विभिन्न संपत्तीसाठी किंवा संपत्तींच्या वर्गासाठी किंवा विभिन्न कर्तव्यांकरता या कलमानुसार असणाऱ्या फीचे दर विभिन्न असू शकतील आणि शक्य होईल तेथवर, वेतने व हा अधिनियम अंमलात आणण्यासाठी येणारा इतर सर्व आनुषंगिक खर्च [ या अधिनियमान्वये होणाऱ्या तोट्याबद्दल विमा उतरवण्यासाठी आवश्यक म्हणून [१]* * * शासन [२]* * * ठरवील अशी रक्कम धरून ] भागवण्यास पुरेशी रक्कम मिळेल अशा रीतीने त्यांची व्यवस्था लावण्यात येईल.

**फीचा विनियोग.**

**१८.** (१) शासकीय न्यासी हा एखादा खाजगी न्यासी असता तर, न्यास निधीमधून ठेवून घेण्यात किंवा चुकते करण्यात आले असते असे सर्व खर्च तसेच ठेवून घेण्यात किंवा चुकते करण्यात येतील, आणि या अधिनियमान्वये वसुलीयोग्य असेल अशी कोणतीही फी त्याच पद्धतीने आणि अशा खर्चाव्यतिरिक्त, ठेवून घेण्यात किंवा चुकती करण्यात येईल.

(२) शासकीय न्यासीला, या अधिनियमान्वये, मिळालेली सर्व फी तो शासन विहित करील अशा प्राधिकरणास आणि अशा रीतीने आणि अशा वेळी हस्तांतरित करील आणि देईल आणि ती रक्कम [१]* * * शासनाच्या लेख्यात नोंदण्यात व जमा करण्यात येईल.

भाग पाच

## लेखापरीक्षा

**शासकीय न्यासीचे लेख, इत्यादींची तपासणी करून शासनास अहवाल देण्याकरिता लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे.**

**१९.** (१) शासकीय न्यासीचे लेखे वर्षातून किमान एकदा आणि शासनाने निदेशित केले तर इतर कोणत्याही वेळी, विहित व्यक्तीकडून आणि विहित रीतीने लेखापरीक्षित केले जातील.

(२) लेखापरीक्षक असे लेखे तपासील, आणि विहित नमुन्यात त्यांचे विवरण त्यावरील अहवालाबरोबर आणि पुढील गोष्टी दर्शविणाऱ्या व त्याने सही केलेल्या प्रमाणपत्राबरोबर शासनाकडे पाठवील.

[३][ (क) लेख्यांची लेखापरीक्षा विहित पद्धतीने केली आहे किंवा नाही आणि अशा लेखापरीक्षेद्वारे निश्चित करणे शक्य असेल तेथवर, त्यात अंतर्भूत असणे आवश्यक असलेल्या प्रत्येक गोष्टीचा संपूर्ण व खरा वृत्तांत त्या लेख्यांत अंतर्भूत आहे किंवा नाही ; ]

(ख) या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमानुसार ठेवण्याचा निदेश दिल्याप्रमाणे शासकीय न्यासीने पुस्तके रीतसर व नियमितपणे ठेवली आहेत किंवा नाहीत ; आणि

(ग) न्यासनिधी व प्रतिभूती रीतसर ठेवल्या आहेत किंवा नाहीत, आणि ते या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांनुसार विहित केलेल्या रीतीने गुंतवले आहेत किंवा नाहीत आणि जमा केले आहेत किंवा नाहीत; किंवा (प्रकरणपरत्वे) अशा लेख्यांत, अशा प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट करता येतील अशा बाबींमध्ये, काही उणीवा आहेत का किंवा या अधिनियमाचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे पालन करण्यात शासकीय न्यासीने काही कसूर केली आहे का.

---

१. १९२२ चा अधिनियम २१, कलम ४ द्वारे "भारत" हा शब्द गाळला.

२. १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८, कलम ११ द्वारे "उत्पन्नाच्या बाबी" हे शब्द गाळले.

३. १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८, कलम १२ द्वारे मूळ खंड (क) ऐवजी घातला.

**साक्षीदारावर समन्स काढण्याचा व दस्तऐवज मागवण्याचा लेखापरीक्षकाचा अधिकार.**

**२०.** (१) दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये प्रत्येक लेखापरीक्षकाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार असतील,— **१९०८ चा ५.**

(क) ज्या कोणत्याही व्यक्तीची उपस्थिती त्याला वेळोवेळी आवश्यक वाटेल तिच्या नावे समन्स काढणे; आणि

(ख) त्याने स्वतःच द्यावयाच्या शपथेवर कोणत्याही व्यक्तीची तपासणी करणे ; आणि

(ग) कोणत्याही व्यक्तीची, परिप्रश्नांवरून किंवा अन्यथा, तपासणी करण्यासाठी आयोगपत्र काढणे; आणि

(घ) अशा लेखापरीक्षेच्या किंवा तपासणीच्या प्रयोजनाकरता जो कोणतीही दस्तऐवज किंवा वस्तू हजर करणे त्याला आवश्यक वाटेल, असा कोणताही दस्तऐवज किंवा वस्तू हजर करण्याकरता कोणत्याही व्यक्तीवर समन्स काढणे.

(२) समन्स काढल्यावर जी कोणतीही व्यक्ती उपस्थित राहण्यास किंवा कोणताही दस्तऐवज किंवा वस्तू हजर करण्यास नकार देईल किंवा कोणतेही संयुक्तिक कारण नसताना त्याकडे दुर्लक्ष करील किंवा उपस्थित राहील परंतु शपथ घेण्यास किंवा तपासणी करू देण्यास नकार देईल, त्या व्यक्तीने भारतीय दंड संहितेच्या कलम १८८ च्या अर्थांतर्गत अपराध केल्याचे व ती शिक्षापात्र असल्याचे मानण्यात येईल आणि अशा नकाराचे व दुर्लक्षाचे प्रत्येक प्रकरण लेखापरीक्षक शासनास कळवील. १९६० चा ४५.

**लेखापरीक्षेचा खर्च, इत्यादी कसा द्यावयाचा.**

**२१.** प्रत्येक लेखापरीक्षेचा व तपासणीचा खर्च आणि आनुषंगिक खर्च शासनाकडून करण्यात आलेल्या नियमांनुसार निर्धारित करण्यात येईल आणि तो विहित रीतीने भागवला जाईल.

**लाभाधिकाऱ्याचा निरीक्षणाचा व लेख्याच्या प्रती मिळण्याचा अधिकार.**

**२२.** शासकीय न्यासीकडून प्रशासित केल्या जाणाऱ्या न्यासाखालील प्रत्येक लाभाधिकाऱ्यास, विहित करण्यात येतील अशा अटींच्या आणि निर्बंधांच्या अधीनतेने, कोणत्याही वाजवी वेळी, अशा न्यासाच्या लेख्यांचे आणि अहवालांचे आणि लेखापरीक्षकाच्या प्रमाणपत्राचे निरीक्षण करण्याचा आणि विहित फी भरल्यानंतर, त्यांच्या प्रती किंवा त्यांतील उतारे पुरवले जाण्याचा हक्क असेल आणि भारतीय न्यास अधिनियम, १८८२ यामधील कोणत्याही गोष्टीमुळे या कलमाच्या तरतुदीस बाधा येणार नाही. १८८२ चा १८.

भाग सहा

## संकीर्ण

**शासकीय न्यासीकडील संचित रकमांचे शासनाकडे हस्तांतरण.**

**२३.** या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर एखाद्या न्यासाखालील एखाद्या लाभाधिकाऱ्याला प्रदेय असलेली कोणतीही रक्कम मिळण्याचा हक्क असलेली व्यक्ती शोधून काढणे शासकीय न्यासीला शक्य झाले नाही व त्याच्या परिणामी कोणत्याही शासकीय न्यासीकडे बारा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीपासून कोणतीही रक्कम राहिली असेल तर, अशी रक्कम विहित रीतीने [1]* * * शासनाच्या लेख्यात हस्तांतरित होईल आणि जमा केली जाईल :

परंतु, जर अशा कोणत्याही रकमेच्या संबंधात कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा किंवा कार्यवाही प्रलंबित असेल तर अशी कोणतीही रक्कम अशा प्रकारे हस्तांतरित केली जाणार नाही.

---

१. १९२२ चा अधिनियम क्रमांक २१, कलम ४ द्वारे "भारत" हा शब्द गाळला.

**अशा प्रकारे हस्तांतरित केलेल्या रकमांच्या वसुलीसाठी मागणीदारांनी करावयाच्या कार्यवाहीची पद्धत.**

**२४.** (१) अशा प्रकारे हस्तांतरित करण्यात आलेल्या कोणत्याही रकमांवर मागणी सांगण्यात आली आणि अशी मागणी विहित प्राधिकरणाचे समाधान होईल अशा प्रकारे सिद्ध करण्यात आली तर, [१]* * * शासन ज्या रकमेच्या संबंधात मागणी सिद्ध करण्यात आली असेल ती रक्कम मागणीदारास देईल.

(२) जर अशी मागणी विहित प्राधिकरणाचे समाधान होईल अशाप्रकारे सिद्ध करण्यात आली नाही तर, मागणीदारास, अशा रकमेच्या वसुलीसाठी इतर कोणतीही कार्यवाही करण्याच्या त्याच्या अधिकारास बाध न आणता [२][शासन] विरुद्ध उच्च न्यायालयाकडे विनंती अर्ज करता येईल आणि असे न्यायालय त्याला योग्य वाटेल असा पुरावा घेतल्यानंतर त्या विनंतीअर्जावर अशी रक्कम देण्याच्या संबंधात त्याला योग्य वाटेल असा आदेश काढू शकेल आणि असा आदेश कार्यवाहीतील सर्व पक्षकारांवर बंधनकारक राहील.

[३]* * * * *

(३) अशा कार्यवाहीचा सर्व खर्च किंवा खर्चाचा कोणताही भाग कोणी द्यावयाचा या संबंधातही ते न्यायालय आणखी आदेश देऊ शकेल.

**शासकीय न्यासीकडे निहित झालेल्या संपत्तीच्या संबंधात आदेश काढण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार.**

**२५.** शासकीय न्यासीकडे निहित झालेल्या कोणत्याही न्यास संपत्तीच्या किंवा तिच्यापासूनचे [४][उत्पन्न] किंवा उत्पादन यांच्या संबंधात, उच्च न्यायालय, त्याला योग्य वाटेल, असे आदेश काढू शकेल.

**अधिनियमान्वये आदेशाकरिता कोण अर्ज करू शकतो.**

**२६.** कोणत्याही न्यास संपत्तीमध्ये लाभप्रद हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा तिच्या कोणत्याही न्यासीने, अर्ज केल्यावर, या अधिनियमान्वये कोणताही आदेश काढता येईल.

**न्यायालयाचा आदेश हुकुमनाम्याप्रमाणेच प्रभावी असणे.**

**२७.** उच्च न्यायालयाने या अधिनियमान्वये काढलेला कोणताही आदेश एखाद्या हुकूमनाम्याप्रमाणे प्रभावी असेल.

---

१. १९२२ चा अधिनियम क्रमांक २१, कलम ४ द्वारे “भारत” हा शब्द गाळला.

२. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे “इंडिया इन कौन्सिलकरता राज्याचा सचिव” याऐवजी घातला.

३. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे परंतुक वगळले.

४. १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८, कलम १३ द्वारे “व्याज” ऐवजी घातला.

**प्रशासनाचे सर्वसाधारण अधिकार.**

**२८.** त्याने कायदेशीररीत्या वापरण्यायोग्य असलेल्या, खर्च करण्यासंबंधीच्या इतर कोणत्याही अधिकाराच्या जोडीने आणि त्यात न्यूनता न आणता, शासकीय न्यासी खालील खर्च करू शकेल :—

(क) त्याच्याद्वारे प्रशासन करण्यात येत असलेल्या कोणत्याही न्यासाच्या मालकीच्या कोणत्याही संपत्तीची योग्य देखरेख व व्यवस्थापन यांसाठी आवश्यक असतील अशा कृत्यांवर ; आणि

(ख) उच्च न्यायालयाच्या मंजुरीने अशा संपत्तीच्या संबंधात वाजवी किंवा योग्य असतील अशा धार्मिक, धर्मादायी आणि इतर उद्दिष्टांवर आणि सुधारणांवर.

**शासकीय न्यासीकडून न्यास संपत्तीचे मूळ न्यासीकडे किंवा इतर कोणत्याही न्यासीकडे हस्तांतरण.**

**२९.** (१) शासकीय न्यासीकडे निहित झालेली कोणतीही संपत्ती त्याच्याकडून खालीलपैकी कोणासही हस्तांतरीत केली जाण्यास या अधिनियमातील कशामुळेही प्रतिबंध होतो असे मानले जाणार नाही,—

(क) मूळ न्यासी (कोणताही असल्यास) त्यास; किंवा

(ख) कायदेशीररीत्या नियुक्त केलेल्या इतर कोणत्याही न्यासीला; किंवा

(ग) न्यायालयाने आदेश दिला असल्यास, इतर कोणत्याही व्यक्तीस.

(२) अशा हस्तांतरणानंतर अशी संपत्ती अशा न्यासीकडे निहित होईल, आणि अशा हस्तांतरणापूर्वी ती ज्या न्यासांवर धारण केली जात असेल त्याच न्यासांवर तो ती धारण करील, आणि शासकीय न्यासीला, अशा हस्तांतरणापूर्वी केलेल्या कृत्याच्या संबंधात असेल ते खेरीजकरून, अशा संपत्तीचा न्यासी म्हणून असलेल्या सर्व दायित्वांतून सूट दिली जाईल :

परंतु, या कलमाखालील कोणत्याही हस्तांतरणाच्या बाबतीत, त्या संपत्तीमधून या अधिनियमाच्या तरतुदींनुसार कोणतीही फी आकारणीयोग्य असल्यास, ती ठेवून घेण्याचा हक्क शासकीय न्यासीला राहील.

**नियम.**

**३०.** (१) या अधिनियमाची उद्दिष्टे अंमलात आणण्यासाठी आणि शासकीय न्यासीने त्याची कर्तव्ये पार पाडताना करावयाच्या कार्यवाहीचे विनियमन करण्याकरता शासन नियम करील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता अशा नियमांद्वारे पुढील गोष्टींसाठी तरतूद करता येईल :—

(क) शासकीय न्यासीने ठेवावयाचे लेखे आणि त्यांची लेखापरीक्षा व निरीक्षण ;

(ख) शासकीय न्यासीला मिळालेला निधी आणि रोखे यांची सुरक्षित अभिरक्षा आणि ठेव ;

(ग) शासकीय न्यासीकडे असलेल्या रकमांचे प्रेषण आवश्यक असेल त्या बाबतीत त्यांचे प्रेषण ;

(घ) शासकीय न्यासीने शासनाला किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाला सादर करावयाची विवरणपत्रे, अनुसूच्या आणि इतर दस्तऐवज आणि अशा विवरणपत्रांचे, अनुसूच्यांचे व इतर दस्तऐवजांचे प्रकाशन ;

(ङ.) अशी कोणतीही विवरणपत्रे, अनुसूच्या व इतर दस्तऐवज तयार करण्यास लागलेल्या खर्चाची वसुली ;

[१]* * * * *

१. १९९७ चा अधिनियम क्रमांक ५, कलम ६ व अनुसूची यांद्वारे खंड (ङ. ङ.) निरसित केला.

(च) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, त्या अन्वये भरावयाची फी आणि अशा प्रकारे नियत केलेल्या कोणत्याही फीची वसुली व तिचे लेखे देणे ;

(छ) या अधिनियमाच्या तरतुदीन्वये कोणत्याही लेखापरीक्षेचा व तदनुषंगिक खर्च ज्या रीतीने आणि ज्या व्यक्तीकडून निर्धारित करण्यात व भागवण्यात येईल ती रीत व व्यक्ती;

(ज) कलम २० च्या तरतुदींन्वये काढण्यात आलेली समन्से बजावण्याची रीत आणि या अधिनियमाच्या तरतुदींन्वये समन्स काढून बोलावलेल्या किंवा तपासणी केलेल्या कोणत्याही व्यक्तीचा खर्च आणि अशा तपासणीचा कोणताही आनुषंगिक खर्च देणे ;

(झ) धार्मिक प्रयोजनाकरता असलेले न्यास आणि व्यवसायाचे व्यवस्थापन किंवा तो चालवणे यांचा अंतर्भाव असलेले न्यास शासकीय न्यासीने स्वीकारणे; आणि

(त्र) या अधिनियमात विहित करण्याचा निदेश देण्यात आलेली कोणतीही बाब.

(३) या कलमाच्या तरतुदींन्वये करण्यात आलेले नियम **राजपत्रामध्ये** प्रकाशित करण्यात येतील, आणि तद्नंतर जणू काय या अधिनियमातच अधिनियमित केल्याप्रमाणे ते प्रभावी होतील.

[१](३क) राज्य शासनाने या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळापुढे ठेवला जाईल.

[२][(४) केंद्र शासनाने या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ते एका सत्राने अथवा [३][दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि ज्या सत्रात तो अशा प्रकारे ठेवण्यात आला असेल ते सत्र किंवा त्याच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, ] त्या नियमात कोणताही बदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा बदललेल्या रूपातच परिणामकारक होईल किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामकारक होणार नाही ; तथापि अशा कोणत्याही बदलामुळे किंवा विलोपनामुळे, तत्पूर्वी त्या नियमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.]

**३१.** [ इलाख्यांचे प्रांतांमध्ये विभाजन ] - '(विधि अनुकूलन) आदेश, १९३७' द्वारे निरसित.

१९०८ चा १६. **३२.** या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ याच्या तरतुदींवर परिणाम होतो असे मानले जाणार नाही. **भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ च्या तरतुदींची व्यावृत्ती.**

१. १९८३ चा अधिनियम क्रमांक २० कलम २ आणि अनुसूची द्वारे समाविष्ट केले (१५ मार्च १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. १९६४ चा अधिनियम क्रमांक ४८, कलम १४ द्वारे समाविष्ट केले.

३. १९८३ चा अधिनियम क्रमांक २०, कलम २ आणि अनुसूची यांद्वारे विवक्षित शब्दाऐवजी दाखल केला (१५ मार्च १९८४ रोजी व तेव्हापासून).

व्यावृत्ती. [1][ (**३२क.** [2][ (१) ] या अधिनियमातील [3][२६ जानेवारी, १९५० ] रोजी अंमलात येणाऱ्या सुधारणांचा, त्या तारखेला कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेल्या कोणत्याही वैध कार्यवाहींवर परिणाम होणार नाही. किंवा कोणतीही संपत्ती कोणत्याही शासकीय न्यासीकडून इतर कोणत्याही शासकीय न्यासीकडे आपोआप हस्तांतरित होते असा त्यांचा अन्वयार्थ लावला जाणार नाही : परंतु या कलमातील कशामुळेही या अधिनियमाच्या कोणत्याही इतर तरतुदींनुसार अशा कोणत्याही संपत्तीच्या हस्तांतरणास प्रतिबंध होतो असा त्याचा अन्वयार्थ लावला जाणार नाही.]

[4][(२) या अधिनियमातील २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात येणाऱ्या सुधारणांचा, एखादा भाग ख राज्यातील कोणत्याही व्यक्तीस हा अधिनियम लागू करण्यामुळे उद्‌भवणाऱ्या आणि उक्त तारखेला कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेल्या कोणत्याही वैध कार्यवाहीवर किंवा अशा कोणत्याही व्यक्तीच्या त्या तारखेच्या लगतपूर्वी शासकीय न्यासीकडे या अधिनियमान्वये निहित झालेल्या कोणत्याही संपत्तीच्या किंवा संपदेच्या प्रशासनावर परिणाम होणार नाही आणि या अधिनियमाच्या तरतुदी उक्त सुधारणा असून सुद्धा अशा कार्यवाहीच्या किंवा अशा संपत्तीच्या किंवा, प्रकरणपरत्वे, संपदेच्या संबंधात, आवश्यक त्या बदलांसह लागू असणे चालू राहील.]

**राज्य पुनर्रचनेचा परिणाम झालेल्या विवक्षित शासकीय न्यासींच्या संबंधातील विशेष तरतूद.** [5][**३२ख.** या अधिनियमाच्या ज्या सुधारणा १ नोव्हेंबर १९५६ रोजी अंमलात येतात ती, त्या तारखेला कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेल्या कोणत्याही वैध कार्यवाहीवर परिणाम करणार नाहीत आणि जेथे राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ अन्वये राज्याची पुनर्रचना झाल्यामुळे किंवा बिहार व पश्चिम बंगाल (प्रदेशांचे १९५६ चा ३७.
हस्तांतरण) अधिनियम, १९५६ अन्वये एखादे संपूर्ण राज्य किंवा त्याचा कोणताही भाग, इतर कोणत्याही राज्याकडे हस्तांतरित करण्यात आला असेल तेथे राज्याच्या प्रदेशाच्या अशा हस्तांतरणाचा अर्थ, कोणत्याही संपत्तीचे कोणत्याही १९५६ चा ४०.
शासकीय न्यासीकडून इतर कोणत्याही शासकीय न्यासीकडे आपोआप हस्तांतरण होते असा लावण्यात येणार नाही, मात्र जर, राज्यक्षेत्रांच्या अशा हस्तांतरणामुळे, एका शासकीय न्यासीकडे निहित झालेली संपूर्ण संपत्ती किंवा तिचा कोणताही भाग दुसऱ्या शासकीय न्यासीकडे निहित झाला पाहिजे असे केंद्र सरकारला वाटले तर, ते सरकार अशा रीतीने संपत्ती निहित करण्याचा निदेश देऊ शकेल आणि तद्‌नंतर, ती संपत्ती जणू काय मुळातच ती या अधिनियमान्वये त्याच्याकडे निहित झाली असल्याप्रमाणे या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ दुसऱ्या शासकीय न्यासीकडे व त्याच्या उत्तराधिकाऱ्याकडे पूर्णतः आणि प्रभावीपणे निहित होईल.]

**३३.** [निरसन] निरसन अधिनियम, १९२७ च्या कलम २ आणि अनुसूची द्वारे निरसित. १९२७ चा १२.

**अनुसूची—**[निरसन अधिनियमिती] उपरोक्त अधिनियमाच्या कलम २ आणि अनुसूची द्वारे निरसित.

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे समाविष्ट केले.

२. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

३. वरील आदेशाद्वारे "भारत शासन अधिनियम, १९३५ च्या भाग तीनचा प्रारंभ" याऐवजी घातला.

४. वरील आदेशाद्वारे समाविष्ट केले.

५. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे समाविष्ट केले.